दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ३ रे अंक १४० वा रविवार दि.२२ ऑक्टोंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## दीर्घकालीन नियोजनामुळे अभूतपूर्व निर्णय : पंतप्रधान



इंदूर : पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी मध्य प्रदेशाच्या दौऱ्यावर होते. सिंधिया शाळेच्या १२५ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला संबोधित करताना ते म्हणाले की, गेल्या १० वर्षांत भाजप सरकारने कलम ३७० रद्द करणे, ओआरओपी लागू करणे, जीएसटी आणणे, तिहेरी तलाक रद्द करणे, महिलांसाठी आरक्षण आणि यासारखी अनेक पावले उचलली आहेत. गेल्या दशकात दीर्घकालीन नियोजनामुळे अभूतपूर्व निर्णय घेण्यात आले आहेत, असे ते म्हणाले. सिंधिया शाळेच्या १२५ व्या वर्धापन दिनानिमित्त त्यांनी टपाल तिकीटाचे प्रकाशनही केले. दिवंगत माधवराव सिंधिया यांचा उल्लेख करत ते म्हणाले की, ते रेल्वेमंत्री असताना देशात शताब्दी एक्स्प्रेस ट्रेन सुरू झाली होती, मात्र त्यानंतर अनेक दशके देशात एकही नवीन ट्रेन सुरू झाली नाही. आता सरकारने आधुनिक ट्रेन, वंदे भारत आणि नमो भारत सारख्या आधुनिक ट्रेन सुरू केल्या आहेत. पंतप्रधान म्हणाले की, त्यांच्या सरकारने देशातील तरुणांसाठी अंतराळ क्षेत्रही खुले केले आहे. मोदींनी सिंधिया शाळेतील विद्यार्थ्यांना गाव दत्तक घेण्यास सांगितले, स्वच्छतेवर लक्ष केंद्रित करावे, शेतकर्यांमध्ये नैसर्गिक शेतीच्या फायद्यांविषयी जागरुकता निर्माण करावी, गरीब कुटुंब दत्तक घ्यावे, भरड धान्य किंवा श्रीअण्णा वापरावे आणि योगासने करण्यास सांगितले.अभिनेता सलमान खान, गायक नितीन मुकेश आणि रेडिओ निवेदक अमीन सयानी यासारख्या काही प्रसिद्ध व्यक्ती या शाळेचे माजी विद्यार्थी आहेत. नितीन मुकेश कार्यक्रमाला विशेष उपस्थित होते.

कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री आणि शाळेच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्ष ज्योतिरादित्य सिंधिया यांनीही संबोधित केले. सिंधिया म्हणाले की, १९८० च्या दशकात जेव्हा माहिती तंत्रज्ञान देशात आणले गेले तेव्हा सिंधिया स्कूल ही देशातील पहिली संस्था होती ज्याचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला होता.

## आंदोलनाची नौटंकी कशाला..?



मुंबई (प्रतिनिधी) देवेंद्र फडणवीस व भाजपा यांनीच राज्यातील तरुणांना नोक-यांपासून वंचित ठेवले आहे. राज्यात येणारे प्रकल्प गुजरातला पळवले आणि सरकारी नोकर भरतीचा खेळखंडोबा करुन तरुणांचे आयुष्य बरबाद केले आहे. त्यामुळे ही आंदोलनाची नौटंकी बंद करून भाजपा व देवेंद्र फडणवीस यांनीच महाराष्ट्राची नाक घासून माफी मागावी, तसेच या पापातील त्यांचे भागीदार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना माफी मागायला सांगावी असा पलटवार काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला.यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, भारतीय जनता पक्ष हा एक नंबरचा खोटारडा पक्ष आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघात बहुदा खोटे बोलण्याचेच प्रशिक्षण दिलेले आहे. त्यामुळे भाजपा नेते सातत्याने खोटे बोलत असतात. कंत्राटी पद्धतीच्या नोकरी भरतीमध्येही देवेंद्र फडणवीस यांनी लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. पण राज्यातील जनता विशेषत: तरुण मुले-मुली यांना भाजपाचा हा खोटारडेपणा समजतो. राज्यात २.५ लाख सरकारी पदे रिक्त असताना ही पदे भाजपा सरकार भरत नाही. शिक्षक भरती, पोलीस भरती, एमपीएससी परिक्षा, तलाठी भरती मधील घोटाळा, हे पाप भाजपाचेच आहे हे सांगण्यासाठी कोणत्या ज्योतिषाची गरज नाही. काही तरुण मुले मुली दोन-तीन वर्षापासून केवळ नियुक्तीपत्र मिळाले नाहीत म्हणून नोकरीवर रुजू होऊ शकलेले नाहीत. एमपीएससी चा सावळा गोंधळ सुरुच आहे. तहसीलदार, नायब तहसीलदार सारखी अत्यंत जबाबदार व महत्वाची पदे एमपीएससीकडून न भरता कंत्राटी पद्धतीने भरण्याचा जीआर मागच्याच महिन्यात काढला होता. पण खोटारडे फडणवीस स्वत:चे पाप दुस-यावर टाकून नामानिराळे राहण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहेत.शिंदेप्रणित भाजपा सरकारने वेदांता फॉक्सकॉन, टाटा एअर बस सारखे विविध मोठे प्रकल्प महाराष्ट्राबाहेर घालवून महाराष्ट्रातील आपल्याच लाखो तरुणांचा रोजगार हिरावून घेण्याचे पाप केले. शेतकरी आत्महत्या वाढल्या, शेतमालाला भाव नाही याचे पाप भाजपा सरकारचेच आहे. गुन्हेगारी वाढली, महागाई वाढली, सत्ताधारी आमदार खासदारांची दादागिरी वाढली, खोके घेऊन महाविकास आघाडीचे सरकार पाडण्याचे पापही भाजपानेच केले आहे. या सर्व पापांबद्दल भारतीय जनता पक्ष, देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांनी महाराष्ट्राच्या १२ कोटी जनतेची शंभरवेळा नाक घासून माफी मागतली तरी त्यांचे पाप फिटणार नाहीत. राज्यातील जनता भाजपाचा कुटील डाव ओळखून आहे, भाजपाच्या पापाचा घडा आता भरला असून जनताच त्यांना घरी बसवेल, असेही पटोले म्हणाले.

## 'बिमस्टेक'च्या सरचिटणीस पदी इंद्रमणी पांडे यांची नियुक्ती



नवी दिल्ली : इंद्रमणी पांडे यांची 'बे ऑफ बंगाल इनिशिएटिव्ह फॉर मल्टी सेक्टरल टेक्निकल अँड इकॉनॉमिक कोऑपरेशन'चे (बिमस्टेक) सरचिटणीस म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. लवकरच ते ही जबाबदारी स्वीकारणार आहेत. त्यांनी आपल्या नियुक्तीची बातमी शेअर करून आनंद व्यक्त केला आहे. इंद्रमणी पांडे म्हणाले की, 'बांगलादेश, भूतान, भारत, म्यानमार, नेपाळ, श्रीलंका आणि थायलंड यांचा समावेश असलेल्या बंगालच्या उपसागरातील प्रमुख प्रादेशिक संघटना बिमस्टेकच्या सरचिटणीसपदी माझी नियुक्ती झाल्याची बातमी सांगताना मला आनंद होत आहे.बिमस्टेकचे मुख्यालय ढाका येथे असून प्रथमच एका भारतीयाला ही जबाबदारी मिळाली आहे. बिमस्टेकमध्ये बांगलादेश, भूतान, भारत, म्यानमार, नेपाळ, श्रीलंका आणि थायलंड यांचा समावेश आहे. नवीन जबाबदारी मिळाल्यावर, इद्रामणी पांडे यांनी बिमस्टेकच्या महासचिवपदाची प्रतिष्ठित आणि आव्हानात्मक जबाबदारी सोपवल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांचे आभार मानले आहेत. इंद्रमणी पांडे हे भारतीय परराष्ट्र सेवेचे १९९० च्या बॅचचे अधिकारी आहेत. सध्या ते जिनिव्हा येथे संयुक्त राष्ट्र आणि इतर आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये भारताचे स्थायी प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत. आता त्यांना नवी आणि मोठी जबाबदारी मिळणार आहे. त्यांनी स्वतः ट्विटद्वारे ही माहिती दिली आहे. इंद्रमणी पांडे यांनी परराष्ट्र मंत्रालयाचा एक स्क्रीन शॉट शेअर केला आहे, ज्यामध्ये असे लिहिले आहे की, बिमस्टेकचे महासचिव पद मिळवण्याची ही पहिलीच वेळ आहे. ते लवकरच आपला कार्यभार स्वीकारतील.

## दहशतवादी दाऊद मलिकचा पाकमध्ये खात्मा



इस्लामाबाद : 'जैश-ए-मोहम्मद' या दहशतवादी संघटनेचा म्होरक्या मसूद अझहरचा निकटवर्ती भारतातील मोस्ट वॉन्टेड दहशतवादी दाऊद मलिक याचा पाकिस्तानमधील वझिरीस्तानमध्ये अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या घालून खून केला. 'जैश-ए-मोहम्मद' व्यतिरिक्त दाऊद मलिक लष्कर-ए-जब्बार आणि लष्कर-ए-जंगवीशीही संबंधित होता.पाकिस्तानमधील उत्तर वझिरीस्तानमधील मिराली भागात मास्क घातलेल्या बंदूकधा-यांनी दाऊद मलिकवर गोळीबार केला. दाऊद मलिक एका खासगी दवाखान्यात असताना हा हल्ला झाल्याचे वृत्त आहे. अज्ञात हल्लेखोर गोळीबार करत घटनास्थळावरून पसार झाले. यावर्षी पाकिस्तानमध्ये उपस्थित असलेले भारताचे अनेक मोस्ट वाँटेड दहशतवादी मारले गेले आहेत. पुलवामा हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने बालाकोटवर हवाई हल्ला केला तेव्हा दाऊद मलिक तेथे उपस्थित असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, त्या हल्ल्यात दाऊद मलिक फरार झाल्याची माहिती नंतर समोर आली. सर्व दहशतवादी आयएसआयच्या संरक्षणाखाली राहत असल्याचे समोर आले होते. शांघाय सहकार्य संघटनेच्या बैठकीपूर्वी पाकिस्तानने मौलाना मसूद अझहर अफगाणिस्तानात असल्याचे सांगितले होते. २० फेब्रुवारीला रावळिंपडीत बशीर अहमद पीर उर्फ इम्तियाजवर गोळ्या झाडण्यात आल्या. केंद्र सरकारच्या दहशतवाद्यांच्या यादीत त्याचा समावेश होता. यानंतर मारला गेलेला भारताचा मोस्ट वॉन्टेड दहशतवादी शाहिद लतीफ हा पाकिस्तानातील गुजरांवाला येथील रहिवासी होता. काही दिवसांपूर्वीच अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर अगदी जवळून गोळ्या झाडल्या होत्या. शाहिद लतीफ हा २०१६ च्या पठाणकोट हल्ल्याचा मास्टरमाईंड होता. त्याने आयएसआयकडून विशेष प्रशिक्षण घेतले होते. जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेने लतीफला सियालकोट सेक्टरच्या प्रमुखाची जबाबदारी दिली होती.लष्कर-ए-जब्बारला जबर धक्का दाऊद मलिकच्या हत्येमुळे लष्कर-ए-जब्बार या दहशतवादी संघटनेसह त्याच्याशी संबंधित असलेल्या दहशतवादी संघटनांच्या नेटवर्कलाही जबर धक्का बसल्याचे मानले जात आहे. पाकिस्तान आणि इतर देशांमध्ये भारतविरोधी दहशतवाद्यांच्या हत्येच्या घटनांना वेग आला आहे. यापूर्वी, कैसर फारूक हा बंदी घातलेल्या दहशतवादी संघटनेच्या संस्थापक सदस्यांपैकी एक होता जो मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाईंड आणि एलईटी प्रमुख हाफिज सईदचा जवळचा सहकारी होता. तो कराचीच्या रस्त्यावर फिरत असताना अज्ञात बंदूकधा-यांनी हल्ला करून गोळ्या घालून ठार केले. या घटनेचा व्हीडीओही सोशल मीडियावर व्हायरल झाला होता.

## औसा भाजपाच्या वतीने निदर्शने...




औसा - राष्ट्रवादी (शरद पवार गट) व शिवसेना (उध्दव ठाकरे) यांनी त्यांच्या कार्यकाळात कंत्राटी नौकर भरतीचा अध्यादेश काढून सुशिक्षीत बेरोजगारांची फसवणूक केली असा आरोप करीत यांच्याविरोधात (दि.२१) रोजी औसा शहरात भाजप पक्षाच्या वतीने आंदोलन करण्यात आले. यावेळी संबंधित दोन्ही गटाच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष सुभाष जाधव,जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, औसा शहरध्यक्ष सुनील उटगे, सभापती चंद्रशेखर सोनवणे, उपसभापती प्रा भीमाशंकर राचट्टे,अरविंद कुलकर्णी, मुक्तेश्वर वागदरे, सुशीलदादा बाजपाई, प्रा सुधीर पोतदार, भिमाशंकर मिटकरी, धनराज परसणे,युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष सचिन आनसरवाडे, मुन्ना वागदरे, लहू कांबळे, धनराज काजळे, शिवरूद्र मुरगे, भागवत कांबळे, गणेश बिराजदार, सुनीता सुर्यवंशी आदीसह भाजपाच्या औसा तालुक्यातील बूथ प्रमुख, शक्तीकेंद्र प्रमुख, न. प.सदस्य, बाजार समिती संचालक, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## वैशालीताई देशमुख यांची उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे यांनी घेतली सदिच्छा भेट



लातूर :- विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई देशमुख यांची लातूर उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे यांनी घेतली सदिच्छा भेट. यावेळी लातूर तहसील कार्यालयाचे नूतन तहसीलदार सौदागर तांदळे, लातूर उपविभागीय कार्यालयातील नायब तहसीलदार सुधीर दादा देशमुख, लातूर तहसील कार्यालयातील निवासी नायब तहसीलदार गणेश सरोदे, महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी मराठवाडा विभागाचे सहसचिव मंजूरखा पठाण, बाभळगाव ग्रामपंचायतचे उपसरपंच गोविंद देशमुख आदी उपस्थित होते

## वंचित बहुजन युवा आघाडी वतीने आयुष्यमान भारत कार्ड कॅम्पचे आयोजन.

मुंबई /शहामत शेख. प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे आयुष्मान भारत ई कार्ड काढल्यास विविध एक हजार दोनशे नऊ प्रकारच्या आजारावर मोफत उपचार आणि शस्त्रक्रियाचा समावेश आहे. पात्र पाच लाख रुपये प्रति वर्ष, प्रती कुटुंब,वैद्यकीय संरक्षण मिळते.या योजनेअंतर्गत शासनाने प्रसिद्ध केलेले यादीतील पात्र लाभार्थी चे आयुष्मान भारत कार्ड काढलेले नाही,त्यांची यादी महानगर पालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. ज्या लाभार्थ्यांचे पात्र यादीमध्ये नाव नसेल या लाभार्थ्यांकरिता ई केवायसी व रजिस्ट्रेशन करून देण्यात येईल. ही सेवा रविवार दिनांक २२ ऑक्टोबर सकाळी १० ते ५ त्यावेळेत सुरू असेल. ही योजना वंचित बहुजन युवा आघाडी मुंबई प्रदेश अध्यक्ष परमेश्वर रणसूर यांच्या मार्गदर्शन अंतर्गत तसेच उत्तर मुंबई जिल्हा युवा अध्यक्ष अजय रोकडे यांच्या सहकार्याने करण्यात आले आहे. तसेच या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्यात यावा,असे आव्हान वंचित बहुजन युवा आघाडी उत्तर मुंबई जिल्हा सचिव व पत्रकार शहामत शेख यांनी केले आहे.




दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

### नारायण राणे यांच्या ‘मराठा अस्मिते’ ला इतिहासाचा निर्विवाद आधार आहे?

‘शेतकऱ्याचा असूड’ या ग्रंथात किंवा पठारे यांच्या चिंतनातला ‘मराठा’ कुणबीच आहे, हे राणे लक्षात घेत नाहीत मराठा आणि कुणबींमध्ये फरक आहे. जरांगे-पाटील मराठा आणि कुणबी एकच असल्याचं सांगतात. पण, तसं काही नाही. जरांगे-पाटलांनी जातीचा आणि घटनेचा अभ्यास करावा. मी मराठा आरक्षणाचा अभ्यास केला आहे. मात्र, जरांगे-पाटील कुणबी प्रमाणपत्र घेतल्याशिवाय राहणार नाही, असं बोलत आहेत. एवढेच बोलून केंद्रीय मंत्री नारायण राणे थांबले नसून ९६ कुळी आणि कुणबी मराठा वेगळा आहे. कुठलाच मराठा कुणबी प्रमाणपत्र घेणार नाही. मीही आयुष्यभर कुणबी प्रमाणपत्र घेणार नाही, असेही म्हणाले आहेत. राणे यांची ही वक्तव्ये चित्रवाणी माध्यमातून, तसेच ‘लोकसत्ता’मधूनही प्रसृत झाली आहेत. त्यामुळे या विषयावर महात्मा फुले यांचे काही संदर्भ आठवले. महात्मा फुले हे त्यांचा ‘शेतकऱ्याचा असूड’ हा सुप्रसिद्ध ग्रंथ लिहीत असण्याच्या काळात त्यांना भेटायला एक गृहस्थ आले होते. त्यांना पाहून ते कोण किंवा कोणत्या जातीचे हे फुल्यांच्या लक्षात येत नव्हते. अशा परिस्थितीत त्या गृहस्थानेच संवाद चालू केला. तो खालीलप्रमाणे- गृहस्थ : तुम्ही ओळखले नाही काय?
महात्मा फुले : नाही महाराज, मी तुम्हाला ओळखले नाही. माफ करा.गृहस्थ : मी मराठी कुळांतील मराठी आहे.
महात्मा फुले : तुम्ही मराठे परंतु तुमची जात कोणती?
गृहस्थ : माझी जात मराठे.महात्मा फुले : महाराष्ट्रांत जेवढे म्हणून महारापासून तो ब्राह्मणांपर्यंत लोक आहेत, त्या सर्वासच मराठे म्हणतात. तरी तुम्ही अमुक जातीचे आहात याचा उलगडा तेवढ्याने होत नाही.गृहस्थ : तर मी कुणबी आहे असे समजा. वरील संवादावरून महात्मा फुले यांच्या काळात मराठे ही संज्ञा कोणाला उद्देशून वापरली जात होती, हे लक्षात यायला हरकत नाही. महात्मा फुले त्यांच्या पूर्वोल्लेखित ग्रंथाच्या उपोद्घातात लिहितात-
वाचकहो, सांप्रत शेतकरी म्हटले म्हणजे त्यामध्ये तीन भेद आहेत. शुद्ध शेतकरी अथवा कुणबी, माळी व धनगर. आतां हे तीन भेद होण्याची कारणे पाहिली असता, मूळचे जे लोक शुद्ध शेतकीवर आपला निर्वाह करू लागले, ते कुळवाडी अथवा कुणबी, जे लोक आपले शेतकीचे काम सांभाळून बागाइती करू लागले, ते माळी व जे ही दोन्हीही करून बकरी वगैरेचे कळप बाळगू लागले, ते धनगर असे निरनिराळ्या कामांवरून प्रथम हे भेद उपस्थित झाले असावेत. परंतु आता या तीन पृथक जातीच मानतात. याचा सांप्रत आपसात फक्त बेटीव्यवहार मात्र होत नाही. बाकी अन्नव्यवहारादी सर्व काही होते. यावरून हे (कुणबी, माळी व धनगर) पूर्वी एकाच शेतकरी जातीचे असावेत. हे लिहीत असताना फुले आपल्या तळटीपेत खालील उल्लेख करतात.शूद्रांचे कुलस्वामी जेजुरीचे खंडेराव यांनी शूद्र (कुणबी) कुळांतील म्हाळसाई व धनगरांतील बानाबाई अशा दोन जातींतील दोन स्त्रिया केल्या होत्या, यावरून पूर्वी कुळवाडी व धनगर यांचा आपसात बेटीव्यवहार होत असे. येथे महात्मा फुले शेतकऱ्यांची वर्गवारी करताना मराठा शेतकरी, असा उल्लेखही करीत नाहीत, हे उल्लेखनीय आहे.प्रसिद्ध लेखक आणि विचारवंत रंगनाथ पठारे त्यांच्या सातपाटील कुलवृत्तांत या विख्यात कादंबरीत पाटीलबाबा ऊर्फ शिवरामबुवा या पात्राच्या तोंडी पुढील मजकूर घालतात. मजकूर कादंबरीमधील पात्राच्या तोंडी असला तरी पठारे यांच्या चिंतनाचे सार त्यात आले असावे. तो मजकूर असा - ..तशे माळी, धनगर, मऱ्हाटी; समदे येकच लोक, समदे कुनबीच. मऱ्हाटी बी मेंढ्या वळितेत, बागायती बी करितेत. पन धंदा करता करता आलक जाती झाल्या आस्तीन. त्याच्यानी सभाव पण आलक व्हत गेला आसन. आन हीच बात बाकीच्या जातीची. आरं लढाईला जान्हारे फकस्ती मऱ्हाटी थोडेच हायेत? पार समदे माळी, धनगरं, वारीकं, शिंपी, कुंभारं, लव्हारं; कोनचेय बी जातेत. हालीच्या जमान्यात ह्ये देसमुक लोकं झाले. ते तरी कुठं आलक हायेत? तेयवी मऱ्हाटीच. स्वोताला उंच कुळीचे म्हन्त्यात. त्यांची कुळी उंच कोनी केली? मुसलमन राजांनी. बाकी फरोक काय नायी. त्यांच्यातयबी गंधर्व लागतो. अन गावाला जेवान धिलं का दोस खलास. आन नाय धिलं तर चार पिढ्यांनी आपाप खलास, आशी बात. (शुद्धलेखन मूळ उताऱ्यानुसार) थोडक्यात, आज ज्यांना मराठे म्हटले जाते, त्यांचा दर्जा १००-२०० वर्षांपूर्वी आजच्यासारखा स्वतंत्र नसावा. पुढे युद्धात भाग घेतलेल्यांचा दर्जा उच्च होत गेला. शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वामुळे या वर्गाला इतर कुणब्यांपेक्षा अधिक प्रतिष्ठा प्राप्त झाली. मराठा साम्राजाच्या काळात त्यांची आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्थिती मोठ्या प्रमाणात सुधारल्यास नवल नाही. त्यातूनच मराठा जात अस्तित्वात आली असेल काय? रंगनाथ पठारे हे आपल्या पूर्वोक्त कादंबरीत कुणबी मातला आणि मराठी झाला या पुण्याच्या आसपास प्रचलित असलेल्या म्हणीचा उल्लेख करतात. थोडक्यात, जेव्हा कुणबी सर्वार्थाने सबळ बनतो, तेव्हा तो स्वतःला मराठा म्हणवितो. अशा सामर्थ्यवान मराठ्यांचे अनुकरण करून सामान्य कुणब्यांनीही स्वतः ला मराठा म्हणवून घेण्यास सुरुवात केली असावी काय? बदलत्या काळात सामान्य मराठा समाजाला आपल्या आर्थिक दुरवस्थेची झळ पोहोचली असावी. आपल्यापेक्षा कनिष्ठ असलेल्या जाती पाहता पाहता आपल्या पुढे जातानाही त्यांनी पाहिल्या. आता ते आपल्या या भ्रामक प्रतिष्ठेच्या कल्पना बाजूला ठेवून जमिनीवरील वास्तवाला तोंड देत असावेत. म्हणूनच आता बहुसंख्य मराठ्यांना कुणबी म्हणवून घेण्याची जरुरी वाटत आहे.जरी नारायण राणे यांच्यासारख्या सधन आणि सत्तेचे लाभधारक असणाऱ्या मराठ्यांना कुणबी असल्याचे प्रमाणपत्र घ्यायचे नसले तरी बहुसंख्य गरीब मराठा त्यांच्याशी सहमत होतीलच असे नाही. तसेच त्यांच्या कुणब्यापासून स्वतंत्र असणाऱ्या मराठा अस्मितेला इतिहासाचा निर्विवाद आधार आहे, असेही वाटत नाही.भारतात व्यवसायापासून जाती झालेल्या असाव्यात.

# अर्थचक्रप्रवर्तन

रुपयाचे व्यवस्थापन सरकारच्या हातात असणे हाच धोक्याचा उगम, हे अभ्यासूपणे सांगणाऱ्या डॉ. आंबेडकरांच्या ग्रंथाची शताब्दी आता साजरी होते आहे.. रुपयाचे व्यवस्थापन सरकारच्या हातात असणे हाच धोक्याचा उगम, हे अभ्यासूपणे सांगणाऱ्या डॉ. आंबेडकरांच्या ग्रंथाची शताब्दी आता साजरी होते आहे..सरकारला प्रश्न विचारण्याचा समृद्ध वारसा आपणा भारतीयांकडे आहे. काही सरकारे प्रश्न विचारू देतात आणि काही सत्ताधारी प्रश्न विचारण्यालाच देशद्रोह समजतात, हा गेल्या सुमारे दीडशे वर्षांतला तपशिलाचा भाग- पण म्हणून भारतीयांनी प्रश्न विचारणे थांबवले नाही. केवळ घणाघाती लेख लिहून किंवा भाषणे करूनच नव्हे, तर पीएच.डी.च्या प्रबंधातून निराळे मत मांडूनसुद्धा प्रश्न विचारण्याचा आपला वैचारिक वारसा आहे. ‘रुपया या चलनाचे व्यवस्थापन (ब्रिटिश) सरकारच्या हातात असणे हाच धोक्याचा उगम असल्याने तो बंद करण्याची वेळ आता आलेली नाही काय?’ इतक्या स्पष्ट शब्दांतला प्रश्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विचारला, तो खुद्द इंग्लंडच्याच राजधानीत- लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये पीएच.डी.साठी सादर केलेल्या प्रबंधातून! हा प्रबंध त्याच वर्षी, लंडनमधील प्रकाशकांकडूनच ‘द प्रॉब्लेम ऑफ द रुपी’ या नावाचा ग्रंथ म्हणून प्रकाशितही झाला आणि डॉ. आंबेडकरांच्या पीएच.डी.चे मार्गदर्शक प्रोफेसर एडविन केनन यांनी त्या पुस्तकाच्या प्रास्ताविकात, डॉ. आंबेडकरांचे विचार पटत नसूनही हे विचार नवे आहेत, सैद्धान्तिकदृष्ट्या पक्के आहेत आणि लोकांना केंद्रस्थानी मानणारे आहेत एवढे मान्य केले. शंभर वर्षांपूर्वी- म्हणजे १९२३ मध्ये प्रकाशित झालेल्या या ग्रंथाचा शताब्दी सोहळा मुंबईत होतो आहे आणि यानंतर कदाचित दिल्लीतही तो होईल, हा केवळ आपल्या उत्सवप्रियतेचा नमुना ठरू नये यासाठी या ग्रंथाने दाखवलेली वैचारिक दिशा कोणती, याचा ऊहापोह आज आवश्यक आहे. रुपयाचे अवमूल्यन करावे का, किती करावे, रुपयाच्या व्यवस्थापनावर- पर्यायाने रिझव्ह बँकेवर- सरकारचे नियंत्रण असावे का, हे प्रश्न आजही महत्त्वाचे ठरतात. पण शंभर वर्षांपूर्वी आंबेडकरांनी ते विचारले तेव्हा ‘भारतीय रिझव्ह बँक’ नावाची यंत्रणाच अस्तित्वात नव्हती. हा काळ १९१९ च्या नंतरचा. तेव्हा रुपयाचे नियंत्रण थेट सरकारच्याच हातांत होते, पण हे कोणते सरकार? टिळकांच्या नेतृत्वाखाली ‘स्वराज्या’साठी भारताचा वज्रनिर्धार दिसल्यामुळे प्रांतिक कायदेमंडळे आणि दिल्लीतील मध्यवर्ती कायदेमंडळ अशी व्यवस्था तेव्हा नुकती अस्तित्वात आली होती. पण या प्रांत किंवा इलाख्यांना महसुलाची पुरेशी साधनेच द्यायची नाहीत अशी मखलाशी (तेव्हाही!) करण्यात आली होती आणि खास मध्यवर्ती सरकारचा म्हणून सीमाशुल्क आदी महसूल प्रांतांना मिळण्याची सोय नव्हती. तशात ब्रिटिश पौंड आणि भारतीय रुपया यांच्या मूल्यात विषमता होतीच- ती आहे, कारण ‘भारताचा व्यापार कमी’ असे ठरीव कारण देणारे अर्थशास्त्रज्ञ जॉन मेनार्ड केन्स यांचेच म्हणणे डॉ. आंबेडकरांनी खोडून काढले. सरकारने लोकोपयोगी खर्चात वाढ केल्यास किमती स्थिर राहून उत्पादनवाढीस- म्हणजे आर्थिक विकासाला- चालना मिळते असे सांगणारा अजरामर सिद्धान्त ज्यांनी मांडला ते हे केन्स. त्यांच्याशी या सिद्धान्तावर डॉ. आंबेडकरांचा वाद नव्हता. पण ब्रिटिश सरकारने भारतासाठी ठरवलेले चलन-प्रमाण जर केन्ससारखे अर्थशास्त्री काहीही प्रश्न न विचारता, डोळे झाकून मान्य करत असतील तर भारत-इंग्लंडच्या व्यापार-समतोलात खोट काढण्यामागे कोणत्या अभ्यासाचे पाठबळ आहे हा सवाल डॉ. आंबेडकरांनी केला आणि त्यावर केन्स यांनाही नमते घ्यावे लागले. ब्रिटिशांनी ठरवलेले चलन-प्रमाण हे त्या वेळी ‘सुवर्ण विनिमय प्रमाण’ किंवा गोल्ड एक्स्चेंज स्टॅण्डर्ड हे होते. म्हणजे सोन्याच्या दरावर रुपयाचा दर ठरणार. पण सोन्याचा दर कुठला? तो मात्र भारतीय रुपयासाठीही लंडनमधलाच. पहिल्या महायुद्धानंतर तिथे सोने महाग म्हणून आपल्या रुपयाचा दर तेवढ्या पटीत कमी. अशा परिस्थितीत



अर्थशास्त्राचे पढीक-पंडित ‘चलनाचे अवमूल्यन’ हा जो उपाय सुचवतात, तोच १९२० नंतर सुचवला गेला होता- रुपयाचे अवमूल्यन करण्याच्या आग्रहाला तेव्हा तर काँग्रेसचाही विरोध नव्हता. याचे एक कारण असे की, काँग्रेस हा तेव्हाच्या व्यापारीवर्गास जवळचा पक्ष! रुपयाच्या अवमूल्यनाने चलनवाढ करावी लागेल, महागाई वाढेल, तिचा फायदा उद्योजक किंवा व्यापारीवर्गास होईलही, पण महागाईच्या तुलनेत रोजंदारी कमावणाऱ्यांची मजुरी काही वाढणार नाही आणि या कष्टकरी वर्गाच्या पोटाला चिमटा बसेल हा विचार तेव्हा डॉ. आंबेडकर प्रबंधातून मांडत होते.या स्थितीवर उपाय म्हणून ‘सुवर्ण विनिमय प्रमाण’ बाद करून थेट ‘सुवर्ण प्रमाण’ आणा, असे प्रतिपादन डॉ. आंबेडकर यांनी या प्रबंधात केले. चलन-प्रमाणाच्या या दोन्ही पद्धती आता इतिहासजमा झाल्या आहेत. अर्थशास्त्राच्या, अर्थव्यवस्थांच्या इतिहासात ज्यांना रस आहे त्यांच्यासाठी डॉ. आंबेडकर यांचा ‘रुपयाचा प्रश्न’विषयक हा प्रबंधच नव्हे तर त्याआधी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाला सादर केलेला, पण पुस्तकरूपाने १९२५ मध्ये प्रकाशित झालेला ‘इव्होल्यूशन ऑफ प्रॉव्हिन्शिअल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया’ हाही प्रबंध अभ्यासण्याजोगा ठरतो. मात्र या दोन अर्थशास्त्रीय ग्रंथांनंतर डॉ. आंबेडकर अर्थशास्त्रापासून दुरावले, राजकारण व समाजकारणातच गुंतून गेले आणि म्हणून अर्थशास्त्राचे क्षेत्र एका विद्वानाला मुकले, असे गळे काढण्यात काहीही अर्थ नाही.

याचे कारण असे की हे अर्थशास्त्र, हे राजकारण आणि हे समाजकारण अशी कप्पेबंदी डॉ. आंबेडकरांनाच मान्य नव्हती. समन्यायी समाजरचनेच्या ध्येयाकडे नेणाऱ्या विविध मार्गावर त्यांची वाटचाल एकाच वेळी अभ्यासूपणे सुरू होती. यापैकी अर्थशास्त्र हा मूलगामी अभ्यासाचा भाग. प्रांतिक सरकारांच्या हाती पैसा नाही म्हणून दलितांसाठी शाळा काढल्या जात नाहीत, यासारखी खंत अर्थशास्त्राच्या परिभाषेत मांडावी लागेल, विनिमय दर ठरतो इंग्लंडातून आणि सरकारचा पैसा खर्च होतो तो आस्थापनेवरच असे साधार आक्षेप घ्यावे लागतील, हे डॉ. आंबेडकर जाणत होतेच, पण त्यावरच्या सर्वंकष उपायासाठी भारतीय चलन-व्यवस्थांच्या इतिहासाचा धांडोळा घेऊन आणि वर्तमान व्यवस्थेतले कच्चे दुवे हेरून काही आग्रह धरावे लागतील ही दिशा त्यांनी शोधल्याचे ‘प्रॉब्लेम ऑफ द रुपी’मधून दिसते. त्यामुळेच, १९२५ मध्ये ब्रिटिशांना भारतीय चलनासाठी हिल्टन यंग यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमावा लागला, त्या आयोगाला डॉ. आंबेडकरांची मसलत घ्यावी लागली आणि त्यानंतर दशकभराने का होईना, भारतीय रिझव्ह बँकेची स्थापना करावी लागली. भारतासाठी निराळ्या रिझव्ह बँकेची संकल्पना मांडणारा म्हणून ‘द प्रॉब्लेम ऑफ द रुपी’ या ग्रंथाचे महत्त्व आहेच. पण त्याहीपेक्षा या ग्रंथाच्या रचनेतून, त्यामधील निर्भीड विधानांमधून आणि निडरपणाला अभ्यासाचा डोळस आधार देण्यातून डॉ. आंबेडकर जी दिशा दाखवतात ती चळवळ आणि अभ्यास यांच्या अद्वैताची आहे, हे आजही महत्त्वाचे ठरते. डॉ. आंबेडकरांनी नंतर लिहिलेल्या अनेक ग्रंथांतूनही समाज-उत्थानाचे ध्येय आणि अभ्यास यांचा हा संगम दिसत राहतो. जातिव्यवस्थेवरील १९१६ सालच्या पुस्तकापासून ‘बुद्ध की कार्ल मार्क्स’, ‘बुद्ध आणि त्याचा धम्म’ या पुस्तकांपर्यंतचा त्यांचा प्रवास धम्मचक्रप्रवर्तनापर्यंत गेला आणि येत्या मंगळवारी त्याचा प्रवर्तनाचा वर्धापन दिनही साजरा होईल. पण डॉ. आंबेडकरांनी केलेले अर्थचक्रप्रवर्तन हे ‘रुपयाचा प्रश्न’ मांडून थांबले नाही. उलट, त्यांचे आर्थिक विचार हा पुढल्या सामाजिक, राजकीय व कायदेविषयक विचारांचा पाया ठरला. त्यांच्या दोन प्रबंधांनी या अर्थचक्रप्रवर्तनाची दिशा स्पष्ट केली. सामाजिक समस्यांमागचे आर्थिक प्रश्न ओळखून धोरणकर्त्यांना नेमके आणि अभ्यासून प्रकटणारे प्रश्न विचारत राहणे, ही ती दिशा. त्या दिशेने पुढे जाणे आणि प्रश्न विचारण्याचा वारसा पुढल्या १०० वर्षे जपण्याची उमेद राखणे, ही अर्थशास्त्राचे महत्त्व ओळखणाऱ्या डॉ. आंबेडकरांना आदरांजली ठरेल.

# विद्युत आणि चुंबकत्व आधारित तंत्रज्ञान!

विश्वात पहिले झेरॉक्स मशिन निर्माण दिवस.

एखाद्या प्रक्रियेचे नाव सर्वनाम होणे किंवा क्रियापद होणे, ही त्या प्रक्रियेच्या लोकमान्यतेचीच खूण असते. आज जगाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यात, एखाद्या दस्तऐवजाची आहे तशी प्रत काढणे, याला त्याची झेरॉक्स काढणे असेच म्हटले जाते. इतक्या लोकोपयोगी आणि लोकप्रिय तंत्राचा शोध मात्र केवळ शोधकाच्या गरजेतून लागला. चेस्टर कार्लसन नावाच्या अमेरिकेतील स्वामित्व हक्कनोंदणी कार्यालयात काम करणाऱ्या गृहस्थांना, रोज अनेक कागदांच्या प्रती तयार करायला लागायच्या. कार्लसनला संधिवात असल्याने हे काम त्यांना अतिकष्टदायक होत होते. ते कष्ट कमी करण्यासाठी काही यांत्रिक उपाय शोधावेत म्हणून ते कामाला लागले. घरच्या स्वयंपाकघरात त्यांनी प्रयोग सुरू केले आणि दि.२२ ऑक्टोबर १९३८ रोजी प्रकाशाचा वापर करून प्रती तयार करण्याचे नवीन तंत्र विकसित करण्यात यश मिळविले. सन १९३९ ते १९४४पर्यंत त्यांनी आयबीएम, जीई यांसारख्या विस कंपन्यांचे उंबरठे झिजवले, पण कुणालाच या यंत्रात काही दम आहे, असे वाटले नाही. अखेर सन १९४७मध्ये हॅलोईड कॉर्पोरेशन या न्यूयॉर्कमधील एका छोट्या कंपनीने यात रस दाखवला आणि या यंत्रांचे व्यावसायिक तत्त्वावर उत्पादन करायची तयारी दाखवली. कार्लसन तोपर्यंत या तंत्रज्ञानाला इलेक्ट्रोफोटोकॉपीइन्ग याच नावाने संबोधत होते. हॅलोईडला हे नाव फार लांबलचक वाटल्याने त्यांनी याला झेरोग्राफी हे नाव दिले. ग्रीक भाषेत याचा अर्थ ड्राय रायटिंग- कोरडे लिखाण असा होतो. या तंत्रावर चालणाऱ्या यंत्रांना त्यांनी झेरॉक्स यंत्रे असे नाव दिले आणि पुढे आपल्या कंपनीचे नावही झेरॉक्स कॉर्पोरेशन असे बदलले.

झेरॉक्स यंत्राची माहिती घेण्याआधी आपण जरा यामध्ये वापरले गेलेले शास्त्र आणि तंत्रज्ञान समजावून घेऊ. आपण सर्वांनीच लहानपणी कपड्यावर फुगा घासल्यावर तो कपड्याला चिकटला जाण्याची जादू अनुभवली आहे. याचे शास्त्रीय कारण स्थिर विद्युत असते, हेही शाळेत शिकल्याचे आठवत असेल. पण यात नक्की काय होते ते पाहू. फुगा कापडावर घासल्याने कापडाच्या पृष्ठभागावरील इलेक्ट्रॉन मोकळे होतात आणि फुग्याला चिकटतात. कापडावरील इलेक्ट्रॉन कमी झाल्याने तो घनभारित- पॉझिटिव्ह होतो तर फुग्यावरील इलेक्ट्रॉन वाढल्याने तो ऋणभारित- निगेटिव्ह होतो. दोन विरुद्ध भाराचे पृष्ठभाग एकमेकांसमोर आल्याने ते एकमेकांना चिकटतात. आता याचा झेरोग्राफीशी काय संबंध? तर विद्युत आणि चुंबकत्व या दोन ऊर्जांनी बनलेल्या प्रकाशामुळे कार्यान्वित होणारा प्रकाशवाहक- फोटोकण्डक्टर हा या तंत्रातील महत्त्वाचा घटक होय. जेव्हा कुठल्याही प्रकाशवाहकावर प्रकाश पडतो तेव्हा त्याचा प्रकाशित झालेला भाग विद्युतभारित होतो, हे तत्त्व या तंत्रज्ञानात वापरले गेले आहे.

यंत्रात कार्यप्रणाली अशी चालते- १) प्रभारीकरण- चार्जिंग: प्रकाशवाहक पदार्थाचा थर असलेला दंडगोल उच्च दाबाच्या स्थिर विद्युतभाराने भारित करण्यात येतो. प्रकाश पडल्यावर विद्युतवाहक बनणाऱ्या सेलेनियम नावाच्या अर्धवाहकाचा याकरता उपयोग केला जातो. २) प्रकाशात आणणे- एक्स्पोजर: प्रखर प्रकाशाचा झोत, ज्याची प्रत काढायची आहे त्या मूळ कागदावरून, प्रकाशवाहक दंडगोलावर परावर्तित करण्यात येतो. कोऱ्या भागावरून येणारा प्रकाश त्या भागातील दंडगोलाला विद्युतवाहक बनवतो आणि त्यामुळे त्यातील विद्युतभार जमिनीत जाऊन- अर्थिंग नाहीसा होतो. मूळ कागदावरील मजकूर-चित्रे असलेल्या भागावरून प्रकाश परावर्तित न झाल्याने त्या भागाला सामोरा गेलेला दंडगोलाचा भाग ऋणभारितच राहतो. यालाच स्थिर विद्युत सुप्त- लॅटेंट प्रतिमा म्हणतात. ३) प्रकटीकरण- डेव्हलॅपिंग: प्रतिमा प्रकट करण्यासाठी टोनर- कोरडी रंगीत रासायनिक पूड (शाई नव्हे) वापरतात. ही पूड घनभारित असते. ज्याप्रमाणे फुग्याच्या खेळात फुगा कापडाला चिकटतो, तशीच जेव्हा ही पूड दंडगोलाच्या संपर्कात येते, तेव्हा दंडगोलाच्या ऋणभारित भागावर चिकटते. ४) हस्तांतरण- ट्रान्सफर: दंडगोलावरील ऋणभारापेक्षा जास्त ऋणभार दिलेला कागद जेव्हा दंडगोलाच्या संपर्कात येतो, तेव्हा दंडगोलावर चिकटलेली पूड कागदावर चिकटते आणि या कागदावर मूळ कागदाची हुबेहूब प्रतिमा तयार होते. ५) वितळणे- फ्युजिंग: प्रतिमा उमटलेला कागद दाब देणाऱ्या रोलरमधून पुढे पाठवताना गरम वातावरणाला सामोरा जातो त्यामुळे टोनरची पूड कागदावर वितळून घट्ट चिकटते.

प्रत काढण्याची प्रक्रिया: अ) ज्याची प्रत काढावयाची आहे, तो कागद यंत्रातील काचेवर ठेवला जातो आणि त्यावर झाकण ठेवले जाते. आ) दिव्याचा प्रखर झोत कागदावरून परावर्तित केला जातो. कागदावरील प्रतिमेनुसार कमी-जास्त प्रकाश परावर्तित होतो. जिथे कागद कोरा आहे, तिथून जास्त तर जिथे काही लिहिलेले आहे तिथून कमी किंवा अजिबात नाही. इ) मूळ कागदाची विद्युत छाया सेलेनियम या प्रकाशवाहकाचा थर दिलेल्या सरकत्या पट्टीवर पडते. आधुनिक यंत्रात दंडगोलाऐवजी पट्टा वापरतात. ई) पट्टा सरकताना ही छायाप्रतिमा आपल्याबरोबर पुढे नेतो. उ) टोनरच्या डब्याजवळून जाताना त्यातील पूड पट्टीवर पसरली जाते. ऊ) विद्युतभारित पूड पट्टीवर मूळ कागदाची प्रतिमा बनवते. ए) दुसऱ्या सरकत्या पट्टीवरून कोरा कागद सोडला जातो. या कागदाला विद्युतभारित केले जाते. ऐ) विद्युतभारित कागद पहिल्या सरकत्या पट्टीजवळून जाताना त्यावरील टोनरची पूड या कागदावर खेचली जाते आणि क्षणार्धात मूळ कागदावरील प्रतिमा कोऱ्या कागदावर उमटते. ओ) कागद पुढे दाब देणाऱ्या दोन गरम रोलरमधून सरकताना त्यावरील टोनरचे कण वितळून कागदावर कायमस्वरूपी प्रतिमा तयार करतात. औ) यंत्रातून मूळ कागदाची हुबेहूब- गरमागरम प्रत बाहेर पडते.

रंगीत प्रती छापताना हेच मूलभूत तंत्र वापरले जाते, फक्त मूळ प्रतिमेच्या छायेतील विद्युतभार वाचून त्याप्रमाणे मूळ रंगाच्या विरोधी रंगाची (लाल- सियान, हिरवा- मॅजेन्टा, निळा- पिवळा) पूड योग्य त्या प्रमाणात पट्टीवर सोडली जाते आणि रंगीत प्रकाशचित्र प्रत यंत्रातून बाहेर पडते. ही यंत्रे डिजिटल तंत्र वापरून चालवता यायला लागल्यापासून मूळ प्रतिमा यंत्रात स्मृतीमध्ये साठवली जाते आणि लेसर तंत्राने छापली जाते किंवा प्रत काढली जाते. आता तर संगणक तंत्र अधिक प्रगत झाल्यामुळे कुठलाही कागद वा प्रतिमा सांख्यिकी- डिजिटल तंत्राने संगणकात साठवता येतात आणि त्याच स्वरूपात कुठेही पाठवता येतात. त्यामुळे भविष्यकाळात झेरॉक्स यंत्र असेल की नाही, हा प्रश्नच आहे!
!! झेरॉक्स मशिन निर्माण दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

------------------


श्री कृ. गो. निकोडे, से. नि. अध्यापक.
पोटेगावरोड, गडचिरोली, जि. गडचिरोली.
भ्रमणध्वनी क्रमांक- ७७७५०४१०८६.

# विज्ञानाने अज्ञान दूर करा.

आज प्रत्येक माणसाच्या हातात मोबाईल,स्मार्टफोन आहे.गरीब असो की श्रीमंत,असंघटित कामगार,असो की संघटित कामगार,कर्मचारी अधिकारी प्रत्येकाच्या ऐपतीप्रमाणे तो मोबाईल घेऊन वापरतो. घरात कॉम्प्युटर,वायफाय,३ जी,४ जी च्या पुढे दररोज वेगाने जात आहे.तरी स्मार्टफोन व कॉम्प्युटरच्या स्किनवर देवादेवीच्या फोटोची छबी ठेवतोच.नेटवर्क नसेल तर स्मार्टफोनच्या स्किनवरील देव,देवी काहीच करू शकत नाही. नेटवर्क फुल आहे आणि रिचार्ज केला नसेल तर?. देव,देवी काई चमत्कार करून मार्ग काढू शकतो काय?.तर बिलकुल नाही.कारण नेटवर्क,स्मार्टफोन कॉम्प्युटर,हार्डवेअर,सोफ्टवेअर हे विज्ञान आहे. माणसांच्या जीवनातील दररोजच्या घडामोडींचा बारकाईने विचार केला तर अज्ञान विज्ञानाने दूर होऊ शकते.अंधश्रद्धा,अज्ञान नष्ट करण्यासाठी विज्ञान जवळ करा. देवाधिकावर,देवीमातावर किंवा कोणत्याही धर्माचा अवमान करणे,कोणाच्या धार्मिक भावना दुखावने हा लेखाचा उद्धेश नाही. तर विज्ञानाने अज्ञान दूर करा हेच सांगण्याचा मुख्य उद्धेश आहे.

भारत अनेक ऋषीमुनी,महापुरुष,महामानव,संत महंतासह तेहतीस कोटी देवांचा देश आहे. ३३ कोटी देवापैकी एका ही देवाचे संपूर्ण नाव सांगता येत नाही. जन्म,शिक्षण,गांव, तालुका,जिल्हा,राज्य कोणते हे कोणीच विचारू शकत नाही. भारतीय जनतेला ते विचारण्याचा अधिकार नाही. ज्याने विचारण्याचा प्रयत्न केला तर तो नास्तिक,देशद्रोही, समाजकंटक ठरतो.प्राथमिक,माध्यमिक शाळा,महाविद्यालयात शिक्षण घेतांना विद्यार्थी समाजशास्त्र,नागरिकशास्त्र,भौतिकशास्त्र,विज्ञानशास्त्र,आर्ट,कॉमर्स,सायन्स अनेक विषयात पदवीधर होऊ बाहेर पडतात. पदवीधर प्रमाण पत्र,एस एस सी,एच एस सी गुणपत्रिका दाखवून नोकरी मिळवितात.नंतर सत्यनारायण महापूजा घालुन किंवा शिर्डी, शेंगाव,कोल्हापूर,कोणत्याही देवस्थानाला नवस फेडून आभार मानतात.परंतु अज्ञानावर मात करून शिक्षण हे वाघिणीचे दूध हेच मान्य करीत नाही.विज्ञान वापरून अज्ञानावर मात केली असे कोणी म्हणत नाही.कपड्याचा शोध मानवाने लावला त्या अगोदर तो झाड़पाला अंगाला बांधून राहत होता. झाडपाला खाऊन उदरनिर्वाह करीत असे, मग मानवाच्या अगोदर असलेल्या देवांकडे एवढे भरजरी कपड़े व मिठाई कसे, कुठून मिळत होते?. असा प्रश्न शंभर टक्के सुशिक्षित वर्गाला कधीच का पडत नाही.म्हणूनच विज्ञानाने अज्ञान दूर करा. आपल्या देशात अतिरेकी येऊन बॉम्बब्लास्ट करुन जातात देव त्यांना का अडवत नाही?. उलटपक्षी मंदिरातच बॉम्ब ठेवून जातात ते कसे?. मंदिरांच्या सुरक्षेसाठी लाखो पोलिसांचा बंदोबस्त का ठेवला जातो? देव स्वत:चे रक्षण करू शकत नाही तर भक्तांचे कसे करणार?. देव दर्शनासाठी पायपीट करणाऱ्या उच्चशिक्षित वर्गाला असा प्रश्न का पडत नाही?. सर्व देवानी भारतातच जन्म का घेतला इतर देशांत एकही देव जन्माला का नाही आला?. संत तुकाराम महाराजांना वैकुंठाला नेणारे देवांचे ते पुष्पक विमान कुठे गेले ज्या मध्ये बसून ते नेहमी पृथ्वीवर यायचे आता का ते येत नाहीत?. विमानाचा शोध राइट बंधुनी लावला हे महाविद्यालयात शिकविले जाते. त्या अगोदर भारतात महाराष्ट्र राज्यातील देऊ,आळंदी, पुणे





जिल्ह्यात तयार झाले होते. हे समाज मनावर बिनबोभाट कोरल्या जाते.आजचे विज्ञान खोटे ठरवून अज्ञान सर्वश्रेष्ठ ठरविल्या जाते.

वाघ,सिंह,उंदीर,डुकरं,कुत्रा,गाय,बैल,म्हैस,रेडा अशी अनेक प्राणी देवा देवीची वाहने होती. त्यांच्या दगडी,मूर्तीची,चांदी,सोन्याची मूर्तीची मनोभावे पूजा अर्चा केली जाते. परंतु जिवंत प्राण्यांची जनावरांची पूजा अर्चा केली जात नाही. खंडोबा जर देव आहे आणि कुत्रा जर खंडोबाचा अवतार आहे तर कुत्रे चावल्यावर लोक इंजेक्शन का घेतात उलटपक्षी देव चावला देव चावला म्हणत पेढ़े का वाटत नाहीत?. खेड्यातील अशिक्षित लोकांना असे प्रश्न पडणार नाहीत,पण उच्चशिक्षित वर्गाला असे प्रश्न का पडत नाही?. हे उच्चशिक्षित लोक अशिक्षित, अज्ञानी अंधश्रद्धा असलेल्या लोकांचे अज्ञान विज्ञानाने दूर का करीत नाही.विज्ञान झपाट्याने पुढे जात असतांना आपण मागे का पडतो?.आपल्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्ताची सुरक्षा देव का घेत नाही?. जर मुहूर्त नक्षत्र ३६ गुण पत्रिका बघुन लग्न केल्यावर नवरा बायकोचा घटस्पोट भांडनाणे का होतात?.बहुतेक लोकांना पाप,पुण्याच्या गोष्टी सांगितल्या जातात. स्वर्ग नरक कोणी पाहून रिटर्न आलाय का?. मग स्वर्ग असा नरक असा हे हुबेहुब कसे पुस्तकात लिहल्या जाते?. बहुसंख्येने लोक म्हणतात लिहलेले खोटे असूच शकत नाही. गोरगरिबांना दुःख मुक्त करून स्वतः ऐश आराम करणारे अशिक्षित अज्ञानी लोकांना शाप देण्याची धमकी देणारे बाबा,महाराज,संत आता देशातील वेगवेगळ्या जेल मध्ये शिक्षा भोगत आहेत. त्या काळी हवे तेव्हा जमिनीवर येणारे देव, कोणालाही शाप देऊन भस्म करणारे आता तसे का नाही करत?. त्यांची पॉवर विज्ञानामुळे संपली आहे.विज्ञानाच्या समोर अज्ञान जास्त वेळ टिकत नाही. ३३ कोटी देवांच्या आरत्या पुजा विधी करणाऱ्या शेतकऱ्यांना गळफास लाऊन आत्महत्या का करावी लागते?.

भारतातील अनेक राज्यात प्रचंड जागृत देवस्थाने आहेत. त्यांची म्हणती माऊथ टू माऊथ होत असते.लालबागचा गणपती बाप्पा राज्यात नव्हे तर देशा विदेशात प्रसिध्द आहे. तिथे भक्तावर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिस सुरक्षा व्यवस्था करावी लागते. त्याचं बरोबर हे आवर्जून सांगितले जाते.आणि भितीवर लिहलेले असते मंदीरांमध्ये खिसेकापू पासून सावध रहावे. म्हणूनच ३३ कोटी देव संरक्षणासाठी असताना सुध्दा देशात हजारो कोटी रुपये सुरक्षा यंत्रणा राबविण्यासाठी खर्च का केले जातात?. तरी आपल्या देशात अज्ञान अंधश्रद्धा विज्ञानावर वरचढ आहे. गोरगरिबांना देवांची, धर्माची भिती दाखवून आर्थिक शोषण करणारे उच्चशिक्षित किंवा उच्चवर्णीय असतात.उच्चशिक्षित देशाचा राष्ट्रपती झाला तरी त्यांचा वर्ण विसरला जात नाही. तसेच उच्चशिक्षित देशाचा सरन्यायाधीश झाला तरी तो आपला धर्म विसरू शकत नाही. देशाचे सर्वोच्च सरन्यायाधिश दगडाच्या धातूच्या निर्जीव मूर्त्यां समोर लोटांगण घालत असेल तर बहुसंख्य लोकांनी त्यांच्या कडून कोणता आदर्श घ्यावा?.कस होईल आपल्या भारत देशाच! उच्चशिक्षित न्याय निवाडा करणारा सर्व लोकांना न्याय देणारा न्यायमूर्ती जऱ निर्जीव मूर्त्यां समोर झोपुन स्वताच शरीर जमिनीवर झोपवतो आणि पूजा करत असेल तर बहुसंख्य लोकांत अशिक्षित,अज्ञानी अंधश्रद्धा वाढविल की कमी होईल?.

स्त्रिया कधी कधी देवीचं रूप असतात,त्यांची कडक उपासना केली की त्या प्रसन्ना होतात आणि संकटातून वाचवतात त्यामुळेच आपल्या देशात स्त्रिया देवाची देवीची पुजा,व्रतवैकल्ये सर्वात जास्त लहानपणा पासून करतात,तरी लैंगिक अत्याचार त्यांच्यावरच का केला जातो?.सुशिक्षित महिलांना असा प्रश्न कधी पडत नाही. उच्चशिक्षित म्हणून त्या विज्ञानाच्या सर्व तत्वज्ञानांचा कॉम्प्युटर,स्मार्टफोनचा नेटवर्किंगचा वापर करून सर्व साधनांचा उपयोग घेतात.शिक्षणाची यांची देवी सरस्वती,यांना चांगली नोकरी मिळाली म्हणूनच चांगला पगार मिळतो,तर म्हणतात लक्ष्मी आमच्यावर प्रसन्न आहे.नवरात्र उत्सवात सर्व सुशिक्षित,उच्चशिक्षित महिला नऊ दिवसात नवरंगाची, साज शृंगारांची, सौभाग्यवतीचे उधळण करतात. आता देशात समाजात महिलांना जो मानसन्मान मिळतो. तो कोणामुळे हे पूर्णपणे विसरतात.त्यांनाही हेच सांगणे अज्ञान विज्ञानाने दूर करा.सत्य स्वीकार आणि आचरणात आना. अंधश्रद्धा आणि अज्ञान हे सर्वच स्तरावर आहे,त्यात अशिक्षित पेक्षा सुशिक्षित जास्त आहेत.आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून वृत्तवाहिन्यांवर जाहिराती देतांना त्यांचा वापर जास्त होतांना दिसत आहे. त्यांचा परिणाम सर्वसामान्य माणसावर होत आहे. सर्व सामान्य लोकांना देव कोप पावला असे सांगून घाबरविले जाते मग देवाचे नारळ हार पेढ़े मागच्या दाराने पुनः दुकानात नेणारे देवाला दिसत नाहीत का?. देवळात दानधर्म कोणाला केला जातो?. यांचा विचार उच्चशिक्षित, कॉम्प्युटर स्मार्टफोन,नेटवर्किंग करणाऱ्यांना कधीच करावा असे का वाटत नाही.अज्ञानाला कुलूप असते,ते विचारांची किल्ली असली तर खोलता येते. विज्ञानाच्या युगात कॉम्प्युटर, स्मार्टफोन प्रत्येकाला पासवर्ड असतो. तरच तो ओपन होतो. माणसांच्या मेंदूत व मनात जे लहान पणा पासुन भरले ते खाली केल्या शिवाय दुसरे बसणार नाही. अज्ञान अंधश्रद्धा हे एकाएकी निघणार नाही,पण उच्चशिक्षित लोकांनी मोबाईल,स्मार्टफोन,कॉम्प्युटर,नेटवर्किंग वापरून अज्ञान दूर करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. म्हणूनच विज्ञानाने अज्ञान दूर करा.

------------------------------

सागर रामभाऊ तायडे,९९२०४०३८५९,भांडुप मुंबई

## पोलीस दिनानिमित्त लातूर पोलीस मुख्यालयात दिली मानवंदना
## जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित

लातूर ( जिमाका ) आज पोलीस स्मृती दिन आहे, त्यानिमित्ताने कर्तव्य बजावत असतांना विरगती प्राप्त झालेल्या पोलीस शहीदांना मानवंदना देण्यात आली. लातूर जिल्हा पोलीस दलाच्या पोलीस मुख्यालयाच्या आवारात असलेल्या शहीद स्मारक येथे सकाळी ०८:०० वाजता लातूर पोलीस दलाच्या वतीने ही मानवंदना देण्यात आली.

१ सप्टेंबर २०२२ ते ३१ ऑगस्ट २०२३ या कालावधीत भारताच्या विविध राज्यामधील पोलीस ठाणे तसेच विशेष पथकांमध्ये कर्तव्य बजावत असताना शहीद झालेल्या १८९ वंदनीय वीर पोलीस अधिकारी व अंमलदार यांना यावेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

लडाख मधील भारतीय सीमेवरील बर्फाच्छादीत व निर्जन अशा हॉटस्प्रिंग या ठिकाणी भारताचे १० पोलीस जवान गस्त घालत असताना २१ ऑक्टोंबर १९५९ रोजी अचानक दबा धरुन बसलेल्या चिनी





सैनिकांनी त्यांच्यावर हल्ला केला. त्या हल्याला शेवटपर्यंत चोख प्रत्युत्तर देत असताना त्यांना वीरगती प्राप्त झाली. या वीर जवानांनी आपल्या देशाच्या सीमेची रक्षण करताना दाखविलेल्या या उच्च कोटीच्या शौर्यांची गाथा इतरांना कळावी तसेच राष्ट्रनिष्ठा, कर्तव्य निष्ठ भावनेची ज्योती प्रत्येकाच्या मनात तेवत राहावी म्हणून शहीद पोलीस जवानांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिनांक २१ ऑक्टोंबर हा दिवस संपुर्ण भारतभर पोलीस स्मृतिदिन म्हणून पाळला जातो.

या स्मृती दिन मानवंदनेसाठी जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक, श्री सोमय मुंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र बाभळगाव लातूर, श्री वैभव कलबुर्गे, अपर पोलीस अधीक्षक डॉक्टर अजय देवरे, सहाय्यक पोलीस अधीक्षक निकेतन कदम, प्रभारी पोलीस उपाधीक्षक पोलीस निरीक्षक श्री सोनकवडे, यांनी तसेच उपस्थित पोलीस अधिकारी व अमलदारांनी स्मृती स्तंभास पुष्पचक्र अर्पण करुन शस्त्र सलामीसह मानवंदना दिली.

यावेळी राखीव पोलीस उपनिरीक्षक श्री दिलीप माने यांचे नेतृत्वाखालील प्लाटूनने सलामी शस्त्र, शोक शस्त्र करून हवेमध्ये ०३ गोळ्यांच्या फैरी झाडून शहिदांना मानवंदना दिली.

यावेळी सूत्रसंचालन व शहिदांचे नाव वाचन सहाय्यक पोलीस निरीक्षक, श्री दयानंद पाटील व महिला पोलीस उपनिरीक्षक मनीषा लटपटे -हंगे यांनी केले. या कार्यक्रमास जिल्ह्यातील ४५ पोलीस अधिकारी व ३५० पोलीस अंमलदार उपस्थित होते.

## सत्यशोधक समाज महासंघाचा उद्या नागपुरात धम्ममेळवावा आयोजित:डी.एस.नरसिंगे

लातूर,दि.२१: सत्यशोधक समाज महासंघाच्यावतीने चलो बुध्द की ओर अभियानांतर्गत,जी.एस.दादा. कांबळे यांच्या समर्पित कार्याला पुढे नेण्यासाठी, सोमवार,दि.२३ ऑक्टोबर २०२३ रोजी दुपारी ४ वाजता दीक्षाभूमी नागपूर येथे मातंग,चर्मकार,ओबीसी समाजाचा धम्म मेळावा आयोजित करण्यात आला आहे,या मेळाव्याला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सत्यशोधक समाज महासंघाचे राज्याध्यक्ष तथा संयोजक डी.एस.नरसिंगे,धम्म प्रचारक चंद्राभाऊ ठाकरे यांनी केले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराची फलश्रुती ,नवदिक्षितांच्या समस्या,त्यावरील उपाय आणि बौध्दमय भारताच्या दिशेने वाटचाल या विषयावर यावेळी संबोधन होणार असून, धम्मचारी आर्यकीर्ती व धम्मचारी विनय सागर यांच्या हस्ते बुध्द पूजा होणार आहे.लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील ज्ञानेश्वरी बटवाड यांच्या अध्यक्षतेखाली बौध्दाचार्य व्ही. के.वाघ यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. या प्रसंगी अजय चौधरी, धम्मचारी मैत्रेय सागर, इंजि.पी.एस.खोब्रागडे,डॉ.भीमराव मस्के, उषाताई बौध्द,छायाताई कुरटकर,नेनंता टिपले, श्रावण गायकवाड, ॲड.नितीन वानखेडे, प्रा.उत्तमकुमार कांबळे, डॉ.उत्तम इंगोले, के.ई.हरिदास यांचे मार्गदर्शन होणार आहे.प्रा.जी.एस.कांबळे गडचांदूर,अरविंद नारायणे बुटीबोरी,नरसिंग घोडके लातूर,सुनील डोंगरे,रामभाऊ वाघमारे यवतमाळ,उमेश दखणे बुटीबोरी,सोहम ठाकरे,संतोष वानखेडे,डॉ.अश्विनकुमार मेश्राम,इंजि. नरेंद्र नेमाने नागपूर,ॲड.भारत खडसे,प्रा.बबन इंगोले अमरावती,उल्हास वानखेडे भद्रावती, नरेंद्र आमटे वर्धा यांची यावेळी प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तरी या कार्यक्रमाला उपस्थित रहावे असे आवाहन सत्यशोधक समाज महासंघाच्या महिला राज्याध्यक्षा मंगल कांबळे, राज्य कोषाध्यख संजय राऊत,तसेच संयोजन समितीचे प्रा.बापू गायकवाड, प्रा.युवराज धसवाडीकर, ॲड.गजानन लासूरे, ॲड.बुध्दभूषण दांडगे, ॲडछ.लहु सुरवसे, शिरीष दिवेकर, चंद्रकांत गवलवाड, राहूल गायकवाड, छगन घोडके, सुतळशीराम घोडके, राजेंद्र बेले, चंद्रोधन जाधव, मयूर शिशूपाल, रविंद्र शिंदे,चंद्रशिल सकपाळ, अमोलकुमार बोधीराज, महेंद्र खंडेराव, किरण कुशालवर्धन, चंद्रकांत रंगारी, बी.बी. कुंडे, संग्राम कांबळे, प्रशांत सोनवणे, सुयोग साळवे, जितेंद्र पवार, ॲड.कांतीलाल गायकवाड, पी.एस. गवळी,सारिपुत्त सावंत, इंजि.राज वाळके, ॲड.अनिल सावंत, इंजि.नितेश सोनवणे, अर्चना बारशिंग,रामदास कांबळे, इंजि.आकाश बिर्हाडे,ॲड.श्रीकांत शिंदे,सुनील डोंगरे, सुहासिनी दांडगे, सावळाराम कासारे, ॲड.बालाजी म्हेत्रे, शारताई राजेंद्र हजारे, बळी सूर्यवंशी, सत्यभामा सूर्यवंशी, नारायण कांबळे इत्यादिंनी केले आहे.

## कर्नाटक ५,६०० नवीन बसेस खरेदी करणार

बंगळुरू : कर्नाटक सरकार महिलांना मोफत बस प्रवासाची सुविधा देते. काँग्रेस सत्तेत आल्यानंतर मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी शक्ती योजना सुरु केली आहे. शक्ती योजनेचे यश आणि लोकांच्या प्रतिसादामुळे प्रेरित होऊन मुख्यमंत्र्यांनी राज्य मार्ग परिवहन महामंडळासाठी आणखी ५,६०० बसेस खरेदी करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या निर्णयाबाबत शनिवारी सीएमओकडून (मुख्यमंत्री कार्यालय) एक निवेदन जारी करण्यात आले. त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी नवीन बस खरेदीसाठी राज्याच्या अर्थसंकल्पात ५०० कोटींची तरतूद केली आहे.अधिकाऱ्यांना खरेदीची प्रक्रिया लवकर पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शक्ती योजना सुरू झाल्यापासून राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत १५ टक्क्यांनी वाढ झाल्याचे सरकारचे म्हणणे आहे. काँग्रेसने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात महिलांना लक्झरी नसलेल्या सरकारी बसमध्ये मोफत प्रवास करण्याचे आश्वासन दिले होते.५० टक्के जागा राखीव कर्नाटक सरकारच्या 'शक्ती' योजनेअंतर्गत, राज्यातील महिला रहिवाशांना सरकारी बसमधून मोफत प्रवास करता येतो. पण ५० टक्के जागा पुरुषांसाठीही राखीव आहेत. महिलांसोबत ट्रान्सजेंडरही मोफत प्रवास करू शकतात.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभागातील जैवतंत्रज्ञान मंचच्या वतीने वैज्ञानिक 'ओसवाल्ड एव्हरी ' यांची जयंती साजरी

लातूर : मराठी साहित्यात विज्ञान साहित्याची वाणवा आहे.कारण इतर साहित्यापेक्षा विज्ञान साहित्य विपुल प्रमाणात लेखन केले गेल्याचे दिसत नाही.त्यामुळे विज्ञानाच्या विद्यार्थ्यांनी,साहित्यिकांनी दर्जेदार असे विज्ञान साहित्य लेखन केले पाहिजे.सृजनशील अशा विज्ञान कथा,कविता,कादंबरी आणि विज्ञानाधिष्ठित वैचारिक लेख आदिं साहित्याची निर्मिती केली पाहिजे. संशोधक व अभ्यासू वृत्तीने लिहिलेले विज्ञानावर आधारित साहित्य पुस्तक रूपाने प्रकाशित केले पाहिजे.ख्यातनाम वैज्ञानिक रघुनाथ माशालकर,डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम यांच्याप्रमाणे दर्जेदार साहित्य लिहिले पाहिजे.शिवाय जयंती साजरी करण्याचा जैवतंत्रज्ञान विभागातर्फे सुरू करण्यात आलेला हा उपक्रम प्रशंसनीय व वैज्ञानिकांचे जीवन दर्शन घडवणारा आहे,असे प्रतिपादन दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या मराठी विभागातील प्रा.डॉ.शेटकार रामशेट्टी यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२१ऑक्टोंबर २०२३ रोजी जैवतंत्रज्ञान विभागातील जैवतंत्रज्ञान मंचच्या वतीने वैज्ञानिक ' ओसवाल्ड एव्हरी ' यांची जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे मराठी विभाग प्रमुख डॉ.रामशेट्टी शेटकार व जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ.कोमल गोमारे यांनी वैज्ञानिकांना पुष्प अर्पण करून केली.कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा.श्रीनिवास कुलकर्णी यांनी केली.वैज्ञानिकांबद्दल बी.एस्सी.जैवतंत्रज्ञान प्रथम वर्षाची विद्यार्थीनी पर्णवी ढवारे यांनी चांगल्या प्रकारे माहिती दिली. ओसवाल्ड थिओडोर एव्हरी ज्युनियर (२१ ऑक्टोबर,१८७७ - फेब्रुवारी २०,१९५५) हे कॅनेडियन-अमेरिकन चिकित्सक आणि वैद्यकीय संशोधक होते.त्यांच्या कारकिर्दीचा मोठा भाग न्यूयॉर्क शहरातील रॉकफेलर हॉस्पिटलमध्ये घालवला. एव्हरी हे पहिल्या आण्विक जीवशास्त्रज्ञांपैकी एक होते आणि इम्युनोकेमिस्ट्रीमधील प्रणेते होते.परंतु ते प्रयोगासाठी (१९४४ मध्ये त्यांचे सहकारी कॉलिन मॅक्लिओड आणि मॅक्लिन मॅककार्टी यांच्यासमवेत प्रकाशित झाले होते.)ज्याने जीन्स आणि क्रोमोसोम्स बनवलेले पदार्थ म्हणून डीएनए वेगळे केले होते,त्यासाठी ते ओळखले जातात. नोबेल पारितोषिक विजेते अर्ने टिसेलियस यांनी





सांगितले की,एव्हरी हे त्यांच्या कार्यासाठी नोबेल पारितोषिक न मिळवण्यासाठी सर्वात योग्य शास्त्रज्ञ होते.जरी त्यांना १९३०,१९४० आणि १९५० च्या दशकात या पुरस्कारासाठी नामांकन मिळाले होते.

जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ.कोमल गोमारे असे म्हणाल्या की,वैज्ञानिकांचे जीवन,त्यांचे कार्य आणि त्यांचा संपूर्ण जीवन प्रवास प्रेरणादायी असतो.वैज्ञानिकांची दृष्टी,त्यांचे संशोधन आणि मांडलेले सिद्धांत विद्यार्थ्यांनी समजून घेणे गरजेचे आहे.जेणेकरून त्या वैज्ञानिकांचे जीवनचरित्र समजणे सोपे होईल. प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड व उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमात जैवतंत्रज्ञान मंचच्या प्रभारी प्रा.मयुरी जाधव आणि प्रा.स्वरूप गावकरे,जैवतंत्रज्ञान मंचचे अध्यक्ष चिन्मय कांबळे,उपाध्यक्ष पर्णवी धावरे,सचिव विजय बोने,सहसचिव जानवी अंबर,कोषाध्यक्ष सुजय पाटील, सहकोषाध्यक्ष सानिया शेख व सहकारी,प्रज्वल कासले,ओम गुंडाले,गजानन पाटील,परशुराम पाचंगे,निशा अडसुळ,सागर करे,विशाखा उफाडे,उत्कर्षा पाटील,श्रुती बिराजदार,रोहित देशमुख त्याचबरोबर जैवतंत्रज्ञान विभागातील बी.एस्सी.प्रथम,द्वितीय व तृतीय वर्षाचे व एम.एस्सी.प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना शाखा लातूर संचलित उत्सव समिती च्या वतीने आयोजित दांडिया कार्यक्रम

उहेझरीं जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर–घुगे, अधिष्ठाता समीर जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर :– १९ ऑक्टोबर रोजी शारदीय नवरात्रौत्सवानिमित्त, महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना शाखा लातूर संचलित उत्सव समिती च्या वतीने आयोजित दांडिया कार्यक्रम व अधिसेविका श्रीमती राजश्री हरंगुळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या कार्यक्रमास मुख्य अधिसेविका अतिविशेषोपचार रुग्णालय लातूर, सहा. अधिसेविका श्रीमती लक्ष्मी आपटे, वि. दे. परिचर्या महाविद्यालयाच्या उप प्राचार्या श्रीमती सुकुमार गुडे, महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना, मुख्यालय लातूर संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष तथा परिचर्या महाविद्यालय लोखंडी सावरगाव चे प्राचार्य श्री अरुण कदम सर, न्युज व्हिजन नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या कुमुदिनी कदम, ईत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

राज्यात शिशुअतिदक्षता विभागाबाबत सर्वत्र चर्चा सुरु असताना ही वि.दे. शा. वै.महा व रु लातूर येथील शिशुअतिदक्षता विभागाचा कार्यभार उत्तमरीत्या सांभाळणाऱ्या प्रभारी परिसेविका तथा बालरोग तज्ञ परिसेविका तसेच याच विभागातील परिचारीका श्रीमती उषा केंद्रे, श्रीमती कविता भातलवंडे, श्रीमती ज्योती बडे यांच्यासह महात्मा फुले जन आरोग्य योजनेची माहिती संकलित करणारे समिती सदस्य श्रीमती छाया चव्हाण, श्रीमती किरण निकम , श्रीमती सुनंदा चिलगर, श्री योगेश वाघ, श्री दिपक सोळंके व उत्कृष्ट रुग्णसेवा देणाऱ्या परिचारिकांना मा. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे व मा. अधिष्ठाता श्री समीर जोशी यांच्या हस्ते उत्सव समिती – संचलित महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना शाखा लातूर च्या वतीने नवदुर्गा सन्मानाने सन्मानित करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना मा. जिल्हाधिकारी यांनी महिलांनी स्वतः साठी वेळ काढून आपले छंद



जोपासला पाहिजे. विशेष म्हणजे जे इथे आलेले त्यांनी सुद्धा स्वतः साठी वेळ काढणं गरजेचं आहे आणि आपण त्यांच्याकडे विशेष लक्ष द्यायला हवे असे म्हणाल्या त्याचबरोबर या दांडिया कार्यक्रमात पन्नाशी उलटूनही अत्यंत उत्साहाने सहभागी झालेल्या परिसेविकांसह इतर सर्व परिचारीका संवर्गाचे,खुप कौतुक केले त्याचबरोबर परिचारीका संवर्गाच्या कुठल्याही अडचणी सोडविण्यासाठी मी स्वतः भक्कमपणे त्यांच्या पाठीशी आहे असे प्रतिपादन केले. माझे व्यक्तिमत्व जडण घडण ही माझ्या आईमुळे आहे. माझी आई एक शिस्तप्रिय परिचारीका तथा परिचर्या महाविद्यालयाच्या प्राचार्या होत्या आणि त्याचा मला खूप आनंद व अभिमान आहे असेही त्या म्हणाल्या. सोबतच जिल्हाधिकारी यांनी दांडिया खेळातही सहभागी झाल्या.. मा. अधिष्ठाता यांनी ही मार्गदर्शन केले. पुढील महिनाभरात परिचारीका संवर्गातील कर्मचाऱ्यांसाठी पाळणाघर कार्यान्वित करण्यात येईल, तसेच परिचारीकां देत असलेल्या उत्कृष्ट सेवेबद्दल परिचारीकां संवर्गाचे कौतुक ही केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती सुमित्रा तोटे यांनी केले, सुत्रसंचलन श्रीमती उणिता देशमाने व श्रीमती रमांजली माने यांनी केले तर आभार श्री बालाजी केदार यांनी व्यक्त केले या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी उत्सव समिती अध्यक्ष किरण निकम, उपाध्यक्ष मीना दैवज्ञ मरापसं शाखा लातूर च्या अध्यक्ष छाया चव्हाण , वनमाला पांचाळ व सर्व समिती सदस्य तसेच वि. दे परिचर्या महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती अश्विनी बेले, श्री योगेश वाघ, श्रीमती मंगल वाघ, ,गिरी अंजना, , श्री भगवान केंद्रे, दिपक शिंदे, मजहर शेख,भागवत मुंडे, सुग्रीव गोरे, विवेक वागलगावे, बिस्मिल्ला शेख, आराधना क्षिरसागर, जयश्री हेंडगे मॅडम, दिपक सोळंके सर, सुनिल कुंटे सर, रमांजली माने, सर्व सदस्य यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले ....

# पत्रकारावर ॲट्रॉसिटीचा खोटा गुन्हा दाखल केल्याप्रकरणी संबंधितांवर कारवाईची मागणी

लातूर : – शिरूर अनंतपाळ येथील पत्रकारावर ट्रॉसिटीचा खोटा गुन्हा दाखल केल्याप्रकरणी संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या लातूर जिल्हा शाखेच्या वतीने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्याकडे शनिवारी करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे, १९ आक्टोबर रोजी शिरुर अनंतपाळ येथील दै. तरुण भारतचे पत्रकार दयानंद बाबुराव कुंभार यांनी ' एन ए न करता ग्रामपंचायतीला २२ प्लॉटची नोंद' या मथळ्याखाली बातमी प्रकाशित केली होती. त्याचा राग मनात धरून मंगेश पाटील व त्यांच्या साथीदारांनी कुंभार यांना बेदम मारहाण केली असता कुंभार यांनी स्थानिक पोलिस ठाण्यात ऑनलाईन



तक्रार केली. परंतु संबंधितांवर गुन्हा न दाखल करता पोलिसांनी अपसात प्रकरण मिटवू, आपली तकार मागे घ्या, असे सांगून कुंभार यांना ठाण्यात बोलावून घेतले. त्यांनतर कुंभार यांच्यावरच ट्रॉसिटीश अन्य कलमाद्वारे खोटा गुन्हा दाखल करून अटक केली आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदन अतिरिक्त पोलीस अधीक्षक अजय देवरे यांनी स्विकारले. यावेळी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अशोक देडे, उपाध्यक्ष अफसर कारभारी, संघटक सुधाकर फुले, सचिव अशोक हाणवते, शहराध्यक्ष महादेव डोंबे, खय्युम शेख, अरुण कांबळे, हारुण मोमिन, वाल्मिकी केंद्रे आदी उपस्थित होते.

# आज सहावी अ. भा.बौद्ध धम्म परिषदेच्या बैठकीचे आयोजन

लातूर :– आज सहावी अ. भा.बौद्ध धम्म परिषदेच्या बैठकीचे आयोजन प्रति वर्षा प्रमाणे याही वर्षी बौ.ध.सं. प्र.चॅ. ट्रस्ट व सर्व उपासक उपासिका यांच्या सौजन्याने सहावी अ. भा. बौध्द धम्म परिषद महाविहार, सातकर्णी नगर लातूर येथे दि.२५ डिसेंबर २०२३ रोजी आयोजित केली आहे.

या संदर्भात विचार विनिमय, मार्गदर्शन, नियोजन बैठकीचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष व आपले मार्गदर्शक पु.भिक्खु डॉ



.उपगुप्त महाथेरो यांच्या अध्यक्षतेखाली दि.२२ ऑक्टोबर २०२३ रविवार रोजी दुपारी ठीक ०१:०० वाजता नालंदा बुध्द विहार प्रकाश नगर लातूर येथे संपन्न होणार आहे. करिता आपण उपस्थित राहावेअसे आव्हान भिक्खु पय्यानंद थेरो संयोजक /सचिव यांनी केले आहे.

# लातूर जिल्ह्यात स्त्री जन्माचा टक्का वाढला...!!

लातूर ( जिमाका ) गेल्या काही वर्षात लातूर जिल्ह्यातील स्त्री जन्माचा दर पुरुषांच्या तुलनेत चिंतनीय कमी झाला होता.. २०१६ साली लातूर जिल्ह्यात हजार पुरुष जन्मा मागे ८८९ एवढा स्त्री जन्म दर होता. 'जिच्या हाती पाळण्याच्या दोरी..तीच जगाला उद्धारी' असं आपण म्हणतो आणि स्त्री जन्माचा दर एवढा कमी झाल्यानंतर 'बेटी बचाओ – बेटी पढाओ ' हा कार्यक्रम हाती घेतला होता. आता सप्टेंबर २०२३ च्या जन्मदरानुसार हा टक्का दर हजारी ९४७ एवढा झाला आहे. राज्याची सरासरी ९२७ आहे, त्यापेक्षाही लातूरचा टक्का वाढल्यामुळे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे यांनी आनंद व्यक्त केला.

देवणी तालुक्यातील स्त्री जन्माचे प्रमाण १०७४ तर अहमदपूर तालुक्याचे प्रमाण ९९३ एवढे आहे. मात्र जिल्ह्यातील जळकोट ८५८, रेणापूर ८३९ आणि शिरूर अनंतपाळ ८२४ एवढे आहे. तर औसा येथे ९३१, चाकूर ९१७, लातूर ९५४, निलंगा ९०६, उदगीर ९७२ असे प्रमाण आहे. जिथे स्त्री जन्माचे प्रमाण कमी आहे त्याठिकाणी जाऊन विशेषतः ज्या घरी पहिली मुलगी आहे. दुसऱ्यांदा गरोदर असलेल्या मातांच्या घरी जाऊन त्यांना बोलणे मुलगा – मुलगी या काळात समान आहेत हे सांगून महिलांसाठीचे कायदे, योजना सांगून त्यांचे समुपदेशन करणे, स्त्री रुग्णालयामध्ये वेळच्या वेळी जाऊन,त्यांच्याकडून कोणतेही गैरकृत्य होणार नाही याची खबरदारी आरोग्य प्रशासनाने घ्यावी अशा सूचनाही जिल्हाधिकारी यांनी दिल्या आहेत.

# लातूरच्या उपविभागीय महसूल अधिकारी रोहिणी नऱ्हे यांच्या हस्ते श्री जय जगदंब देवीची महापूजा



लातूर :–श्री जय जगदंबा देवीची महापूजा लातूरच्या उपविभागीय महसूल अधिकारी रोहिणी नऱ्हे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी माजी आमदार वैजनाथ शिंदे, नायब तहसीलदार सुधीर देशमुख, ॲड. उमेश पाटील, वीरभद्र वाले व मंडळाचे अन्य पदाधिकारी दिसत आहेत.

# अंगणवाडी कर्मचाऱ्यांना यावर्षीही 'भाऊबीज भेट' मिळणार – महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

मुंबई – ग्रामीण व शहरी भागातील लहान बालकांच्या आरोग्य व पोषणाची काळजी घेणाऱ्या अंगणवाडी सेविका , मदतनीस तसेच मिनी अंगणवाडी सेविका यांना यावर्षीही दिवाळीला भाऊबीज भेट देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून यासाठी सदतीस कोटी तेहतीस लाख दोन हजार रूपये एवढा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. अशी माहीती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.



यावेळी मंत्री कुमारी तटकरे म्हणाल्या की , ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांचे पोषण , स्तनदा माता , गरोदर महीलांना घरपोच पोषण आहार देणे , त्यांना मार्गदर्शन करणे तसेच शासन व जिल्हा परीषदेच्या विविध योजना व उपक्रम राबविण्यात अंगणवाडी सेविकांचा मोठा सहभाग असतो. हाच विचार लक्षात घेवून एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत सन २०२३ – २४ या आर्थिक वर्षाकरीता कार्यरत अंगणवाडी सेविका व मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका या मानधनावरील कर्मचाऱ्यांना भाऊबीज भेट वितरीत करण्यात येणार आहे. या बाबतचा शासन निर्णय महिला व बालविकास विभागाकडून निर्गमीत करण्यात आला आहे. ही मदत लवकरात लवकर जिल्हयात वितरीत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# मोटार सायकल चोरीच्या आरोपीकडून चार मोटारसायकली जप्त. तीन गुन्हे उघड.

लातूर– मोटार सायकल चोरीच्या आरोपीकडून चार मोटारसायकली जप्त. तीन गुन्हे उघड. पोलीस ठाणे मुरुडची कामगिरी.*

या बाबत थोडक्यात हकीकत अशी की, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे स्तरावर पोलीस स्टेशनला घडलेले मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरिता पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते.

पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या विशेषतः मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता विशेष पथके स्थापन करून गुन्हे उघड करण्याचे प्रयत्न सुरू होते .




**पोलीस ठाणे मुरुडची कामगिरी.**

त्या अनुषंगाने पोलीस ठाणे मुरुडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब नरवटे यांचे नेतृत्वात पोलीस अमलदारांचे पथक पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये पेट्रोलिंग करून माहिती संकलित करीत होते.

चोरीच्या गुन्ह्याच्या माहितीचे संकलन करीत असताना, माहिती घेत असताना दिनांक २० ऑक्टोंबर २०२३ रोजी मौजे तांदुळजा येथे सकाळी ०९:३० वाजण्याचे सुमारास तांदुळजा चौकात रांजनी रोड कडुन एक काळया रंगाची हिरो होंडा मोटार सायकल एक इसम संशयीतरित्या भरधाव वेगात येत असल्याचे दिसल्याने त्यास थांबवुन त्याचे याचे नाव गाव विचारता त्याने त्याचे नाव तानाजी राम शिंदे, वय ३० वर्ष, रा. एरंडी सारोळा ता. औसा जि.लातूर असे असल्याचे सांगितले.

त्यास त्याचे ताब्यातील मोटरसायकल क्रमांक एम.एच.२४झेड३१५७चे कागदपत्राबाबत विचारपुस केली असता, तो उडवा–उडवीची व संयुक्तिक उत्तरे देत नसल्याने त्याचेवर अधिक संशय वाढला.

सदर संशयीत इसमास पोलीस स्टेशन आणून त्याचेकडे कसुन चौकशी केली असता, मुरुड येथे त्याचे ताब्यातील मोटार सायकल चोरीची असल्याचे निष्पन्न झाले व त्याचेकडे अधिक चौकशी केली असता त्याने आणखी ०३ मोटार सायकली काढून दिल्या. अशा एकूण ०४ मोटार सायकली काढून दिल्या. लातूर जिल्ह्याच्या विविध पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या मोटार सायकल चोरीच्या गुन्ह्याचे अभिलेखाचे पाहणी केली असता वर नमुद ०४ मोटार सायकली पैकी ०३ मोटार सायकली शिवाजीनगर पोलीस स्टेशन, लातूर हद्दीतून चोरलेल्या असलेने संशयीत आरोपी, ०४ मोटार सायकलसह पोलीस स्टेशन शिवाजीनगर,लातूर यांचेकडे हजर केले आहे.

सदरची कामगीरी पोलीस अधिक्षक सोमय मुंडे ,अपर पोलीस अधिक्षक डॉ.अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर ग्रामीण) सुनील गोसावी यांचे मार्गदर्शनाखाली मुरुड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब नरवटे यांच्या नेतृत्वात पोलीस अमलदार नाना जाधवर, बाबासाहेब खोपे, बोईनवाड,राठोड यांनी पार पाडली आहे.

# राज्याचे राजकीय नेतृत्व महाविद्यालयातील विद्यार्थी संसदेमधून निर्माण होते – प्रा. डॉ. जगदीश देशमुख यांचे प्रतिपादन

मुरूड/महेंद्र आल्टे : प्रत्येक महाविद्यालयातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा सर्वांगीण विकास होत असतो. त्याकरिता महाविद्यालयात वेळोवेळी वेगवेगळे कार्यक्रम राबविले जात असतात त्याचाच एक भाग म्हणजे महाविद्यालयीन विद्यार्थी संसद होय व या विद्यार्थी संसदेतून राजकीय नेतृत्वाचा विकास होतो असे प्रतिपादन डॉक्टर जगदीश देशमुख यांनी केले. संभाजी महाविद्यालयाच्या विद्यार्थी संसदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. पुढे ते म्हणाले की, भारत हा तरुणांचा देश आहे व आजचे तरुण हे उद्याच्या देशाचे आधारस्तंभ आहेत या महाविद्यालयात मुलींची संख्या जास्त आहे आज प्रत्येक क्षेत्रात महिला अग्रेसर असल्याचे दिसून येते त्यामुळे विद्यार्थिनींनी महाविद्यालयातील कालावधीत स्वतःचा सर्वांगीण विकास करून घेतला पाहिजे या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.मधुकर क्षीरसागर यांनी केले त्यावेळी त्यांनी विद्यार्थी संसदेची रचना व संसदीय कार्यपद्धतीवर प्रकाश टाकला. संभाजी महाविद्यालयाच्या विद्यार्थी संसद सचिवपदी कु. श्रद्धा शिंदे यांची निवड करण्यात आली यावेळी सर्व विद्यार्थी संसद सदस्यांचे स्वागत करण्यात आले सदरील कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना समाज जागृती शिक्षण संस्थेचे सचिव एडवोकेट विजय पाटील म्हणाले की, विद्यार्थी संसदेतील सर्व वर्गप्रतिनिधी वर्गाचे प्रतिनिधित्व करत असतात त्यांनी विद्यार्थ्यांच्या समस्या प्राचार्यांकडे मांडून त्या सोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. मीना कदम यांनी केले तर आभार प्रा. महादेव गायकवाड यांनी मानले या कार्यक्रमास प्रभारी प्राचार्य डॉ. अनंत पिडगे, प्रा. डॉ. संदेश उबाळे, समिती सदस्य डॉ.पद्माकर देशमुख, प्रा.मधुकर क्षीरसागर, प्रा.दीक्षित व मोठ्या संख्येने विद्यार्थी , प्राध्यापक आणि कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE